# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१९

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### आडगांव (जि.नाशिक) येथील पोलिस कर्मचारी वसाहतीमध्ये मूलभूत सुविधा देण्याबाबत

**(१) ५७०९१ (२३-०८-२०१६) श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आडगांव (जि.नाशिक) येथील पोलिस कर्मचारी वसाहतीमध्ये रस्ते, पाणी, वीज अशा मूलभूत सुविधांचा अभाव असून याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांकडे वारंवार तक्रार करुनही कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करून सदर पोलिस कर्मचारी वसाहतीमध्ये आवश्यक त्या मूलभूत सुविधा देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०१-२०१९) :** (१) व (२) आडगांव, जि. नाशिक येथील पोलीस वसाहतीमध्ये आवश्यक त्या मूलभूत सुविधा पुरविण्याबाबतची कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सांगली शहरातील सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्यामुळे विविध गुन्हयांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याबाबत

**(२) ७९२३९ (२१-०४-२०१७) श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली शहरातील सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्यामुळे घरफोडी, चेन स्नॅचिंग, खुन तसेच महिला छेडछाडी यासारख्या विविध गुन्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरात यापूर्वी बसविण्यात आलेले व बंद असलेले सर्व सीसीटीव्ही कॅमेरे पूर्ववत सुरु करुन शहरातील इतरही सर्व महत्वाच्या व संवेदनशील ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे तसेच त्यास किती कालावधी लागण्याचे अपेक्षित आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०१-२०१९) :** (१) नाही, सांगली शहरातील सीसीटीव्ही कॅमेरे बंद आहेत परंतु खाजगी कॅमेऱ्यांचा उपयोग करुन घडलेला गुन्हा उघडकीस आणण्याचा प्रयत्न करीत असल्यामुळे गुन्ह्यामध्ये वाढ झाल्याचे दिसून येत नाही.
(२) सांगली शहरातील बंद असलेले सीसीटीव्ही कॅमेरे दुरुस्त करुन घेण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. तसेच इतर महत्वाच्या व संवेदनशील ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी जिल्हा नियोजन समितीमार्फत निधी उपलब्ध करुन घेण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य शासनाचे बनावट शासन निर्णय समाज माध्यमामध्ये प्रसारीत झाल्याबाबत

**(३) ८५०८९ (०४-०९-२०१७). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शेतक-यांना पेन्शन लागू करण्यात आले आहे असे माहे एप्रिल-मे २०१७ मध्ये वा त्यादरम्यान शासनाचे बनावट शासन निर्णय (जी.आर.) काढून सोशल मिडीयामध्ये व्हायरल करण्यात आले, या बनावट जी.आर.चे अनेकांनी अभिनंदनही केले तरीही शासनाने याबाबत कोणतीच कारवाई केली नसल्याचे बघून पुन्हा महाराष्ट्र शासन, प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक अंक पा-१२१७/प्र.क्र.४६ आठ हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा,मंत्रालय मुंबई दिंनाक ८ मे २०१७ असा आदेश क्रमांक असलेला आणि शासकीय कर्मचा-यांचे वय ५८ वरून ६० करण्यात आले असल्याचे नमूद असलेला बनावट शासन निर्णय सोशल मिडीयावर व्हायरल करण्यात आले असल्याची माहिती माहे दिंनाक १५ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निर्देशनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या बनावट शसन निर्णय प्रकरणी राज्य शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तदनुसार या गंभीर प्रकरणी संबंधीत दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०१-२०१९) :**(१) राज्यातील शेतक-यांना पेन्शन लागू करण्याबाबत बनावट शासन निर्णय सोशल मिडीयामध्ये व्हायरल झाल्याबाबत राज्यातील पोलीस घटकांत कोणत्याही गुन्ह्याची नोंद झालेली नाही.

तथापि शासकीय कर्मचा-यांचे निवृत्तीचे वय ५८ वरुन ६० करण्यात आले असल्याचे नमुद असलेला शासन निर्णय क्रमांक अकंपा-१२१७/प्र.क्र.४६/आठ, दि.८ मे, २०१७ हा बनावट असल्याबाबत निदर्शनास येताच सामान्य प्रशासन विभागाने दि.०९.०५.२०१७ रोजी प्रसिद्धीपत्रक निर्गमित केले आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात पोलिसांच्या प्रलंबित असलेल्या मागण्यांबात

**(४) ८६६४७ (०४-०९-२०१७) श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पोलिसांची सेवा ही अत्यावश्यक असून वाढत्या लोकसंख्येमुळे सर्वत्र गुन्हेगारीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे, अपु-या मनुष्यबळावर २४ तास काम करीत असतांना पोलीस यंत्रणेवर कामाचा प्रचंड ताण पडत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुसरीकडे पोलीस सेवेमध्ये काम करणा-या कर्मचारी व अधिका-यांच्या कुटूंबावरही त्याचा ताण येत असल्यामुळे त्यांचे स्वास्थ बिघडत असून वर्षानुवर्षे अन्यायाच्या दुष्टचक्रात अडकलेल्या पोलिसांच्या प्रलंबित मागण्यांचा पाठपुरावा करण्यासाठी त्यांनी आता पोलीस पत्नी संघटना स्थापन करुन ठाण्यात धरणे आंदोलन केले असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पोलिसांच्या उक्त प्रलंबित असलेल्या मागण्यांबात शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०१-२०१९) : (**१) अंशत: खरे आहे.

(२) शासकीय विश्रामगृह ,ठाणे शहर येथे दि.१८.४.२०१७ रोजी पोलीसांच्या विविध मागण्याबाबत ४० ते ५० महिला समिती सदस्यानी एक दिवसीय धरणे आंदोलन करून त्यांचे निवेदन पोलीस आायुक्त ठाणे शहर व निवासी उप जिल्हाधिकारी यांना दिले.

(३) पोलीस दलाचा सुधारीत मनुष्यबळाचा आकृतीबंध तयार करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उल्हासनगर, (जि. ठाणे) येथे गुन्हेगारी रोखण्याकरीता सी.सी.टी.वी कॅमेरे बसविण्यास होत असलेल्या विलंबाबाबत**

**(५) ८८५७७ (०४-०९-२०१७) श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर येथील गुन्हेगारी सातत्याने वाढत असल्याचे पाहता, स्थानिक लोकप्रपिनिधींनी दिनांक २० नोव्हेंबर, २०१५ पासून अद्यापपर्यंत शासनाशी वारंवार लेखी पत्रव्यवहार करून शहरात सी.सी.टी.वी कॅमेरे बसविण्याकरीता आमदार स्थानिक विकास निधी वापरण्याची अनुमती मागीतली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत दीड वर्षाचा कालावधी उलटल्यानंतरही शासनाकडून जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांना दिलेले पत्र जिल्हाधिका-यांनी पोलीस आयुक्त ठाणे यांना अग्रेषीत करण्यापलीकडे कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीमध्ये मा. पालकमंत्री महोदयांनी सी.सी.टी .वी. कॅमेरा बसविण्यास जिल्हा वार्षिक योजनेतून निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले होते, हे ही खरे आहे काय ,

(४) असल्यास, सी.सी.टी .वी. कॅमेरा बसविण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०१-२०१९) :** (१), (२), (३) व (४) हो हे खरे आहे,

याबाबत परिमंडळातील सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी आवश्यक ठिकाणांची माहिती पोलीस महासंचालक कार्यालयामार्फत संबंधित घटकाकडून मागविण्यात आलेली आहे. सदर माहिती प्राप्त झाल्यानंतर याबाबत उचित कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्र सागरी मंडळ (एमएमबी) "महाजनको" आणि नागपूर सुधार प्रन्यासाच्या माध्यमातून नागपूर सी प्लेन सुविधा सुरु करण्याबाबत**

**(६) ८९५६५ (२३-०८-२०१७) डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील पर्यटकांना आकर्षित करण्याकरिता महाराष्ट्र सागरी मंडळ (एमएमबी) "महाजनको" आणि नागपूर सुधार प्रन्यासाच्या माध्यमातून नागपूर सी प्लेन सुविधा सुरु करण्याचा निर्णय दिनांक ३१ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही सुविधा विदर्भात कोणकोणत्या ठिकाणी सुरु करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, हा उपक्रम मुंबईतही सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रस्तावावर निर्णय घेतला आहे काय, नसल्यास, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०१-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) विदर्भातील कोराडी, इरई डॅम (ताडोबा) व पारस बराज (शेगाव), अंबाझरी, नवेगाव खैरी व मीहान येथे सी प्लेन सुविधा सुरु करण्याचे विचाराधीन आहे.
(३) सद्यस्थितीत मुंबईत सी प्लेन सुरु करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोला येथील चान्नी पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरिक्षक यांच्याविरूध्द असलेल्या तक्रारीबाबत

**(७) ९१८७४ (०४-०९-२०१७) श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला येथील चान्नी पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरिक्षक तथा प्रभारी ठाणेदार श्री.वैभव पाटील यांच्याविरूध्द तपासाच्या नावाखाली आरोपीला जबर मारहाण करून त्यानंतर खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची धमकी दिल्याचा आरोप माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने सदर सहायक पोलिस निरिक्षक यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०१-२०१९) :** (१) होय.
(२) व (३) श्री.वैभव पाटील, सहा.पोलीस निरीक्षक तथा प्रभारी ठाणेदार यांच्या विरोधात दिनांक २४/५/२०१७, १९/६/२०१७, २२/६/२०१७ अन्वये तक्रार अर्ज प्राप्त झाले होते. त्यासंबंधात उपविभागीय पोलीस अधिकारी, बाळापुर यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांचेविरुध्द प्राप्त तक्रारीची चौकशी केली असता तक्रारीमध्ये कोणतेही तथ्य आढळून आले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईसह राज्यातील शहरामधून बेपत्ता झालेल्या मुलांच्या तपासात हलगर्जीपणा होत असल्याबाबत**

**(८) ९८५०५ (०६-०१-२०१८) श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यातील शहरामधून मुले पळवून नेणा-या टोळ्यांकडून मुलांना बेकायदेशिर कार्यामध्ये ढकलले जाणे, कारखान्यांमध्ये कामाला जुंपणे, घरकामाला लावणे, परदेशात विकणे अशा प्रकारे शोषण केले जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेपत्ता झालेल्या वा हरवलेल्या मुलांचा शोध घेण्यास पोलिसांकडून योग्य तो तपास केला जात नाही अशी बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रश्न गांर्भीयाने घेऊन बेपत्ता झालेल्या मुलांच्या तपास यंत्रणा सक्षमकरुन मुले पळविणा-या टोळ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०१-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) १८ वर्षाखालील हरविलेल्या लहान मुलांच्या बाबतीत मा. सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. ७५/२०१२, बचपन बचाव आंदोलन या संबंधाने दिनांक १०.५.२०१३ रोजीच्या आदेशानुसार १८ वर्षाखालील हरविलेल्या मुलांबाबत अपहरणाचा गुन्हा (FIR) दाखल करण्यात येतो.

१८ वर्षाखालील हरविलेल्या लहान मुलांच्याबाबतीत अपहरणाचा गुन्हा दाखल झाल्यापासून ४ महिन्यांच्या आत सदर लहान मुले मिळून न आल्यास त्याबाबतचा तपास अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने तपासासाठी हाती घेण्याकरीता 'अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष (AHTU)' स्थापन करण्यात आले आहेत.

हरविलेल्या लहान मुलांचा शोध घेण्याकरीता प्रमाणित कार्यपध्दती (SOP) तयार करण्यात आलेली असून हरविलेल्या मुलांच्या संदर्भात इंटरनेटवर केंद्र सरकारची www.trackthemissingchild.gov.in, मुंबई पोलीसांची www.mumbaipolice.gov.in, मुंबई रेल्वे पोलीसांची www.shodh.gov.in या वेबसाईट कार्यान्वित आहेत.

लहान मुलांचा शोध घेवून त्यांना त्यांचे कुटुंबियांकडे/पालकांकडे देण्याकरीता ऑपरेशन मुस्कान शोध मोहिमा वारंवार राबविण्यात येतात. आतापर्यात सन २०१५ ते २०१८ या कालावधीत ऑपरेशन मुस्कानच्या ६ शोध मोहिमा राबविण्यात आल्या आहेत.

मुले पळविणाऱ्या टोळ्या आढळून आल्यास अशा टोळ्यांवर सध्याच्या प्रचलित कायद्यानुसार कठोरातील कठोर कारवाई करण्याची तजवीज ठेवण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिंचोटी (ता. अलिबाग जि. रायगड) येथील ॲड. राकेश नारायण पाटील व त्यांच्या कुटुंबियांना जातपंचायतीने बेकायदेशिरपणे वाळीत टाकल्याबाबत**

**(९) ९९८५१ (०६-०१-२०१८) श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिंचोटी (ता. अलिबाग जि. रायगड) येथील ॲड. राकेश नारायण पाटील व त्यांच्या कुटुंबियांना जातपंचायतीचे पंच व सदस्य यांनी सुडबुध्दीने व बेकायदेशिरपणे गावकीमध्ये ठराव करुन वाळीत टाकल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करुन जातपंचायतीचे पंच व सदस्य यांच्याविरुध्द कारवाई करण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधी-भिवंडी पूर्व यांनी मा.मुख्यमंत्री, जिल्हाधिकारी, रायगड व पोलिस अधिक्षक, रायगड यांच्याकडे दिनांक २८ जुलै, २०१७ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार जातपंचायतीच्या पंच व सदस्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०२-२०१९) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) फिर्यादीने दिलेल्या तक्रारीनुसार रेवदांडा पोलीस ठाणे, ता. अलिबाग, जि. रायगड येथे गु.र.नं. ५१/२०१७, भा.द.वि.सं. कलम १५३ (अ), १२० (ब), २९४, ५०४, ५०६, २०१, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरचा गुन्हा सद्यस्थितीत न्यायप्रविष्ट आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयातील चिमटा उर्फ निम्न पैनगंगा प्रकल्पात झालेला गैरव्यवहार**

**(१०) १०१३४५ (०६-०१-२०१८) श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील चिमटा ऊर्फ निम्नपैनगंगा प्रकल्पाबाबत २० हजार शेतक-यांचे जमीन अधिग्रहण व ४५ गाव पुर्नवसन करण्यात येणार असल्याने शासनाकडून शेतक-यांना मोबदला देण्यासाठी प्राप्त झालेल्या निधीत ७ कोटी रूपयांचा अपहार केल्याचे माहे जानेवारी, २००० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असल्याने संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १२१ शेतक-यांची जमिन ओलिताखाली दाखवून तसेच ९० एकर गायरान जमिन बळकावून अधिकारी व कर्मचा-यांनी अभिकर्ताशी (एजंट) संगनमत करुन गैरव्यवहार केला परंतु ६ वर्षे पूर्ण होऊनही गैरव्यवहार करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची चौकशी प्रलंबित असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार सदरील अधिकारी व कर्मचारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०१-२०१९) :** (१), (२) व (३) सदर प्रकरणी किनवट पोलिस स्टेशन येथे गु.र.क्र.११/२०१४ भा.दं.वि.स. कलम ४०६, ४०९, ४२०, ४६७, ४६८, ४७१, १२० (ब) प्रमाणे एकुण १३ अधिकारी/कर्मचारी यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी ७ आरोपींविरूध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून सदर गुन्हा सद्यस्थितीत न्यायप्रविष्ठ आहे. यातील ६ आरोपी मयत झाले असून मयत आरोपीतांविषयी ॲबेटेड समरी मंजूर होणेसाठी मा.न्यायालयास विनंती करण्यात आली आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

## वरणगाव (ता.भुसावळ, जि.जळगाव) येथे पोलीस प्रशिक्षण केंद्रासाठी अधिकारी/कर्मचा-यांची पदे भरणे व इमारतीचे बांधकाम करण्याबाबत

**(११) १०५०१७ (०७-०४-२०१८) श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरणगाव (ता.भुसावळ जि.जळगाव) येथे पोलीस प्रशिक्षण केंद्रासाठी अधिकारी/कर्मचा-यांची पदे प्रस्तावित केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावास शासनाने मंजुरी दिली आहे काय,
(३) असल्यास, वरणगाव, प्रशिक्षण केंद्राच्या इमारतीचे बांधकाम महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्या., मुंबई यांच्याकडून मान्यता देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, वरणगाव, पोलीस प्रशिक्षण केंद्रासाठी अधिकारी/कर्मचा-यांची पदे भरण्याबाबत तसेच इमारतीचे बांधकाम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०१-२०१९) : (**१) हे खरे आहे.
(२) नाही.
(३) व (४) नाही

राज्यातील विद्यमान पोलीस प्रशिक्षण विद्यालये ही नवीन पोलीस शिपायांना प्रशिक्षण देण्यास सक्षम असल्याने वरणगाव येथे नवीन पोलीस प्रशिक्षण केंद्र तयार करण्याची आवश्यकता नाही,असे पोलीस महासंचालक यांनी कळविले असून सदर अहवाल अद्याप स्विकारलेला नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**क्राईम इन महाराष्ट्र-२०१६ च्या अहवालानूसार बालगुन्हेगारीमध्ये वाढ झाल्याबाबत**

**(१२) १०५५६८ (२६-०४-२०१८). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.किशोर पाटील (पाचोरा), प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गुन्हेगारीचा लेखाजोखा मांडणारे 'क्राईम इन महाराष्ट्र-२०१६' च्या अहवालानूसार १६ ते १८ वयातील बालगुन्हेगारीमध्ये १३.८४ टक्क्यांनी तर सामान्य गुन्हेगारीच्या प्रमाणातही मोठी वाढ झाल्याची माहिती माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अहवालानुसार जबरी चोरी वगळता हत्या, हत्येचा प्रयत्न, सदोष मनुष्यवध, बलात्कार, विनयभंग, चोरी, दरोडा इत्यादी गुन्ह्यांची नोंद २०१४ आणि २०१५ पेक्षाही जास्त आहे तसेच सन २०१६ मध्ये अल्पवयीन युवकांविरोधात ६२३९ गुन्हे दाखल करण्यात आले तर सन २०१५ मध्ये गुन्हयांची संख्या ५४८२ होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राष्ट्रीय अपराध रेकॉर्डस ब्यूरोने केलेल्या पाहणीत गुन्हेगारी वर्तुळात अल्पवयीन मुलांनी लाखाहून अधिकचा आकडा पार केला असून महाराष्ट्र राज्य तिस-या स्थानांवर असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बालगुन्हेगारीचे गुन्हे मुंबई, सातारा, पुणे शहरात सर्वाधिक होत असल्याची माहिती पुढे आली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यातील वाढती बालगुन्हे रोखण्यासाठी धोरण आखण्याबाबत तसेच या बालगुन्हेगारीतील मुलांचे पुनर्वसन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०२-२०१९) :** (१), (२) व (३) क्राईम इन महाराष्ट्र -२०१६ च्या अहवालानुसार सन २०१६ सालात बालगुन्हेगारीमध्ये भा.दं.वि. कलमाखाली एकूण ६२३९ गुन्हे दाखल झाले असून सन २०१५ सालात ५४८२ इतके गुन्हे दाखल होते.

| अ.क्र. | गुन्ह्याचे शिर्षक | २०१४ | २०१५ | २०१६ |
|---|---|---|---|---|
| १ | खून | १२१ | १२८ | १३० |
| २ | खूनाचा प्रयत्न | १३७ | १८८ | २११ |
| ३ | सदोष मनुष्यवध | ५ | ३ | ७ |
| ४ | बलात्कार | २०८ | २४७ | २५८ |
| ५ | बलात्काराचा प्रयत्न | ० | १ | १ |
| ६ | घरफोडी | ६० | ६१ | ६५ |
| ७ | चोरी | २९३ | ३३६ | २८१ |
| ८ | अनैसर्गिक गुन्हे | ८ | ३२ | ३९ |

(४) होय, हे खरे आहे.

(५) विधिसंघर्षगस्त बालकांकडून होणारे गुन्हे रोखण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजना खालीलप्रमाणे आहेत :-

- सर्व घटकप्रमुखांना बालगुन्हेगारी रोखणेसंदर्भात मार्गदर्शक सुचना दिलेल्या आहेत.
- विधिसंघर्ष बालकांसाठी राज्यातील प्रत्येक जिल्हयात एक असे एकूण ३५ बाल न्यायालये गठीत करण्यात आली आहेत.
- राज्यातील एकूण १०६२ पोलीस ठाण्यांपैकी १०५० पोलीस ठाण्यांमध्ये एक पोलीस अधिकारी हा बाल कल्याण अधिकारी म्हणून नेमण्यात आलेला आहे. सदर अधिकारी बालकांसंबधी पोलीसांचे कार्यवाहीत समन्वये साधण्याचे काम करतात. तसेच सर्व पोलीस घटकांचे मुख्यालयात विशेष बाल पोलीस पथक स्थापन करण्यात आलेली आहेत. तसेच सर्व ४५ पोलीस घटकांचे मुख्यालयात विशेष बाल पोलीस पथक स्थापन करण्यात आलेली आहेत.
- नवीन अधिनियमानुसार सर्व पोलीस घटकांत विशेष बालपथक स्थापन करणेबाबत पोलीस महासंचालक कार्यालयाने दि. १४.०२.२०१८ अन्वये सर्व पोलीस घटकांमध्ये विशेष बाल पोलीस पथक स्थापन करणेबाबत सुचना निर्गमित केल्या आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वाळकेश्वर (मुंबई) येथील लिजेंड इमारतीला लागलेल्या आगीबाबत**

**(१३) १०६११४ (१२-०४-२०१८) श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री. आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री. नसीम खान (चांदिवली), श्री. सुनिल केदार (सावनेर), श्री. अमर काळे (आर्वी), श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री. भारत भालके (पंढरपूर), श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री. बाळासाहेब थोरात (संगमनेर), ॲड. यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा. विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), प्रा. वर्षा गायकवाड (धारावी), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाळकेश्वर (मुंबई) येथील लिजेंड इमारतीला दिनांक २५ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास आग लागली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आगीची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०२-२०१९) :** (१) वाळकेश्वर येथील लिजेंड इमारतीला दिनांक २५.१२.२०१७ रोजी आग लागली होती हे खरे आहे.
(२) सदर आगीची बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आली असून, सदर आग "सदोष विद्युत प्रणाली" मुळे लागली असल्याचे आढळून आले.

तसेच, सदर इमारतीचे भोगवटादार यांनी महाराष्ट्र अग्निसुरक्षा व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ च्या तरतुदीनुसार सदर इमारतीतील स्थायी अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित व सुस्थितीत असल्याबाबत आवश्यक असलेले "प्रपत्र-ब" सादर करण्यात आल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्याच्या पोलीस दलाच्या सशक्तीकरणासाठी केंद्र सरकारने तरतूद केलेला निधी शासनास अद्याप मिळाला नसल्याबाबत**

**(१४) १०७५८७ (१२-०४-२०१८) डॉ.राहूल पाटील (परभणी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या महाराष्ट्र पोलीस दलाच्या सशक्तीकरणासाठी केंद्र सरकारने तरतूद केलेला रुपये ५५ कोटीचा निधी राज्य शासनाला मिळालेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील गडचिरोली, गोंदिया व चंद्रपूर या नक्षलवादीग्रस्त जिल्ह्यात पोलीस दलाच्या सशक्तीकरणासाठी केंद्र शासनाकडून विशेष निधी दिला जातो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निधी राज्य शासनास मिळावा यासाठी केंद्र शासनाकडे राज्य शासनाने केलेल्या पाठपुराव्याचे स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०१-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) होय, हे खरे आहे,

सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात केंद्र शासनाकडून एस.आर.ई. "सुरक्षा विषयक खर्च" अंतर्गत रुपये १५,०४,८७,०००/- एवढा निधी राज्य शासनास मिळालेला आहे. त्याच प्रमाणे केंद्र

शासनाने सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता एस.आर.ई. "सुरक्षा विषयक खर्च" अंतर्गत रुपये ५१,४६,२०,०००/- इतक्या रक्कमेचा कृती आराखडा मंजूर केला आहे. त्यापैकी रक्कम रुपये ३४,९२,५२,०००/- केंद्र शासनाचा हिस्सा (Share) म्हणून राज्य शासनाला देण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देहेड (ता. भोकरदन, जि. जालना) ह्या गावात मागासवर्गीय जनतेवर स्थानिक राजकारणी, गावगुंड, समाजकंटक यांच्याकडून अत्याचार होत असल्याबाबत**

**(१५) ११४२८४ (१४-०४-२०१८) ॲड.वारीस पठाण (भायखळा), श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देहेड (ता. भोकरदन, जि. जालना) ह्या गावात बौद्ध जनतेचा स्थानिक राजकारणी, गावगुंड, समाजकंटक यांच्याकडून अनन्वित छळ सुरू असल्याच्या असंख्य तक्रारी स्थानिक नागरिकांमार्फत पोलीस व जिल्हा प्रशासनाकडे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान लेखी स्वरूपात दाखल होऊनही अद्याप पिडीत लोकांना कोणतीही मदत अथवा आरोपीविरोधात कायदेशीर कारवाई करण्यात आली नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बुद्धविहारावर लावलेला पंचशील झेंडा समाजकंटकांकडून काढून रात्रीच्या वेळेत जाळण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, देहेड हे गाव भोकरदन तालुक्यापासून (जि. जालना) अवघ्या दहा ते पंधरा किलोमीटर अंतरावर आहे, या गावामध्ये दिनांक २३ जानेवारी, २०१८ रोजीपासुन बौद्ध बांधवांवर स्मशानभूमीच्या वादातून अत्याचार होत आहेत, म्हणून ॲट्रोसिटी अंतर्गत गुन्हा नोंदवून कारवाई करण्याची मागणी स्थानिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जातीवादाची भूमिका घेऊन मागासवर्गीय जनतेत दहशत पसरवून तणाव निर्माण करणाऱ्या गावाचे शासकीय अनुदान शासनामार्फत रोखून धरण्यात येणार आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पीडितांना न्याय मिळवून देण्याच्या उद्देशाने दोषापितांविरोधात कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.

दि. २७.०६.२०१७ रोजी दलित समाज बांधवांनी दिलेल्या अर्जानुसार स्मशानभूमिच्या तार कंपाउंडला इतर गावकऱ्यांचा विरोध आहे. परंतु दोन्ही समाजाच्या आपसी सामंजस्याने सदर वाद मिटला असुन तेथे तार कंपाउंड करून बॅनर व झेंडा लावला आहे. सदर झेंडा कोणीतरी अज्ञात व्यक्तीने जाळला म्हणून फिर्यादीने दिलेल्या तक्रारीनुसार अनु. जाती जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, १९८९ अंतर्गत गुन्हा नोंद केला आहे.

(२) होय, हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) हे खरे नाही.
(५) फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून भोकरदन पोलीस ठाणे येथे गु.र.नं. २०/२०१८, भा.द.वि.सं. कलम २९५, ४३५, ४२७, ३४ सह अनु. जाती जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, १९८९ कलम ३(I)(r)(s) प्रमाणे गुन्हा दाखल आहे. सदर गुन्ह्यातील दोन संशयीतांना मा. जिल्हा सत्र न्यायाधिश, जालना यांचे आदेशान्वये जामिनावर मुक्त केले आहे.

गुन्ह्याच्या तपासात संशयीत आरोपीविरूध्द ठोस व सबळ पुरावे समोर आले नसल्याने तपासी अधिकारी यांना कायम तपासावर ठेवून गुन्हा 'अ' अन्वये निकाली काढला आहे. सदर गुन्हा उघडकीस आणण्याच्या दृष्टीने सर्वोतोपरी प्रयत्न सुरू आहेत.
(६) प्रश्न उद्‌भवत  नाही.

---

## मौजे ऐनवली (ता. खेड, जि.रत्नागिरी) येथे एका मुलीचा झालेला संशयास्पद मृत्यु

**(१६) ११६७०८ (२५-०७-२०१८). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे ऐनवली (ता. खेड, जि.रत्नागिरी) येथील अंकिता जंगम (वय १९) हिच्या संशयास्पद मृत्यू प्रकरणाचा तपास आठ दिवसांत सीआयडीकडे वर्ग करून तात्काळ चौकशी करण्यात येईल, असे आश्वासन मा. राज्यमंत्री, गृह (ग्रामीण) यांनी दिनांक ८ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास  दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हा तपास सीआयडीकडे वर्ग करण्यात आला आहे काय आणि मुख्य आरोपींना अटक करण्यात आली आहे काय व तपासाची सद्यस्थिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०२-२०१९) :**(१)  होय, हे खरे आहे.
(२) फिर्यादीने दिलेल्या तक्रारीनुसार खेड पोलीस ठाणे, जि. रत्नागिरी  येथे  गु.र.नं. ०१ /२०१८  भा.दं.वि. कलम ३०६, १७६,३४ प्रमाणे  आरोपीतांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास गुन्हे अन्वेषण विभाग यांचेकडे वर्ग करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यातील आरोपी क्र. १ हा विधी संघर्षीत बालक असल्याने त्यास दि. ०४/०१/२०१८ रोजी मा. पिठासीन अधिकारी, बालन्याय मंडळ, रत्नागिरी यांचे समक्ष हजर करण्यात आले आहे. आरोपीत क्र. २ ते ५ यांना दि. ०१/०१/२०१८ रोजी व आरोपीत क्र. ६ याला दि. ०३/०१/२०१८ रोजी अटक करण्यात आली. सध्या आरोपीत क्र. २ ते ६ यांना जामीन मिळाला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत  नाही.

---

**मे. माझगाव मजुर सहकारी संस्था मर्यादीत,काळाचौकी मुंबई यांनी बनावट देयकाच्या आधारे शासनाची फसवणूक केल्याबाबत**

**(१७) १२०८४२ (२६-०७-२०१८) श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मे. माझगाव मजुर सहकारी संस्था मर्यादीत,काळाचौकी मुंबई यांनी बनावट देयकाच्या आधारे शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी आरोपींविरुध्द गुन्हा दाखल झालेला असून तपास सुरू आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी भायखळा पोलीस ठाणे येथे दिनांक २ जून २०१७ रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी लेखी तक्रार दिल्यानंतर संबंधितावर गु.र.क्र.१७८/२०१७ भा.द.वी. कलम ४२०, ४६५, ४६७,४७१,३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आले असतांना सुध्दा गेल्या १२ महिन्यापासून संबंधितांना अघापही अटक करुन कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सदर प्रकरण तपासाधिन असल्याचे सांगून संबंधित दोषींना अद्यापपर्यंत अटक न करण्याची कारणे काय आहेत ,

(४) असल्यास, या गंभीर प्रकरणी शासनाने चौकशी करून संबधितावर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०१-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) प्रस्तुत प्रकरणी भायखळा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.१७८/२०१७ भा.द.वी. कलम ४२०, ४६५, ४६७, ४७१, ३४ अन्वये ४ आरोपींविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

भायखळा पोलीस ठाणे, मुंबई यांच्याकडून सहाय्यक अभियंता (सार्वजनिक बांधकाम), परळ, मुंबई व इतर संबंधीत कार्यालयात पुराव्याच्या दृष्टीने महत्त्वाची कागदपत्रे मिळणेकामी पत्रव्यवहार करण्यात आला असून सदरची कागदपत्रे प्राप्त करुन पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

**कल्याण पश्चिम (जि. ठाणे) येथील म्हाडा वसाहतीची पुनर्विकासाकरीता घेतलेल्या इमारतीत घर न मिळाल्याने एका व्यक्तीने केलेला आत्महत्येचा प्रयत्न**

**(१८) १२२६८८ (३०-०७-२०१८). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण पश्चिम (जि. ठाणे) येथील बिर्ला महाविद्यालय समोरील म्हाडा वसाहतीची जुनी इमारत ८ वर्षापूर्वी पटेल विकासकाने पुनर्विकासाकरीता घेतली होती, परंतु कराराप्रमाणे घर देण्यास टाळाटाळ करीत असल्यामुळे श्री. श्याम लाडे या व्यक्तीने नैराश्येतून गोळ्या खाऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याचे दिनांक ११ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी महात्मा पोलीस गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईसह विविध भागामध्ये एसआरएचे प्रकल्प रखडले असून त्यामुळे रहिवाश्यांना घरे मिळण्यासाठी प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे, याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०१-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजना कार्यान्वित करण्याकरिता महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ मध्ये माननीय राष्ट्रपती महोदयांच्या मान्यतेने सुधारणा करण्यात आली असून त्या अनुषंगाने शासन अधिसूचना दि. २६.०४.२०१८ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन यसोजनेस गती मिळण्यासाठी शासनाने खालील उपाययोजना केलेल्या आहेत :-

१. ऑनलाईन प्रणालीद्वारे ९० दिवसात परिशिष्ट-२ सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित करणे.

२. झोपडपट्टी पुनर्वसन योजनांचे प्रस्ताव ऑनलाईन प्रणालीवर परिशिष्ट-१ ते परिशिष्ट-६ पूर्ण भरून त्यांच्या आवश्यकत्या दस्तऐवजाच्या प्रति स्कॅन करून प्रणालीवर प्राधिकरणाला विकासकाकडून सादर करणे.

३. प्राधिकरणाकडून असे ऑनलाइन प्राप्त झालेले प्रस्ताव मूळ दस्तऐवजाशी पडताळणी करून स्वीकृत करण्यास योग्य असल्यास स्विकृतीची पावती विकासकाला देऊन प्रस्तावाची नोंद प्राधिकरणाकडे स्विकृत प्रस्ताव म्हणून होईल.

४. स्वीकृत प्रस्तावांमध्ये प्राप्त झालेले परिशिष्ट-२ प्रस्ताव स्वीकृत होतात सक्षम प्राधिकाऱ्यांकडे आपोआप रवाना होईल.

५. प्रणालीवरील मतदार यादीची संगणकीकृत माहिती वीज देयकाची संगणकीकृत माहिती इत्यादी प्रकारच्या सर्व पुराव्यांची संगणकीकृत शासकीय माहिती बरोबरच परिशिष्ट-२ द्वारे प्राप्त झालेल्या पुराव्यांची आपोआप ताळमेळ घालून प्रारूप परिशिष्ट-२ सक्षम प्राधिकाऱ्यांकडे प्रस्ताव स्वीकृतीच्या वेळीच उपलब्ध असेल

६. सक्षम प्राधिकाऱ्यानी संबंधित क्षेत्रांची प्रत्यक्ष पहाणी, मोजणी इत्यादी तपशिलाची स्थळपाहणी करून त्याचा तपशील ऑनलाईन प्रणालीवर विहित कालावधीत नोंदविणे सक्षम प्राधिकाऱ्यांवर बंधनकारक राहील.

७. क्षेत्र तपशील नोंदविला जाताच साधारणतः ९० दिवसांच्या आत विकासकाने सादर केलेल्या योजनेतील एकूण झोपडपट्टयांची संख्या त्यातील पात्र झोपडीधारक, अपात्र झोपडीधारक, झोपडपट्टीच्या क्षेत्राचे आकारमान व मालकी इत्यादी तपशील संगणकावरच उपलब्ध झाल्यामुळे त्यात मानवी हस्तक्षेप कमी होईल.

८. प्रणाली विकसित होताना प्राथमिकदृष्ट्या परिशिष्ट-२ वर भर देण्यात येत असला तरी या प्रणालीचे मूल्यमापन करून प्राधिकरण स्तरावर देण्यात येत असलेल्या मंजुरीचे देखील संगणीकरण करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत  नाही.

---

## पुणे येथे गेनबिटकॉईन डॉट कॉम या संकेतस्थळाच्या माध्यमातून फसवणुक झालेल्या गुंतवणुकदारांच्या विविध मागण्याबाबत

**(१९) १२३०५३ (२६-०७-२०१८) श्री.राहूल कुल (दौंड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील निगडी पोलीस ठाणे तसेच दत्तवाडी पोलीस ठाणे येथे गेनबिटकॉईन डॉट कॉम या संकेतस्थळाच्या माध्यमातून गुंतवणूकदारांची कोट्यवधी रुपयांची फसवणुक करणा-यांविरूद्ध गुन्हा दाखल करून गेनबिटकॉईन डॉट कॉम पीडितांचा न्याय मंच यांनी विविध मागण्याचे निवेदन मा. पोलीस आयुक्त पुणे शहर यांना दिनांक १८ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर फसवणुकीबाबत निगडी पोलीस ठाणे, पुणे, दत्तवाडी पोलीस ठाणे, पुणे वाशी पोलीस ठाणे, ईओडब्लु (EOW) मुंबई, विमाननगर पोलीस ठाणे, नांदेड आदी ठिकाणीही माहे मार्च, २०१७ ते जून २०१८ या दरम्यान गुन्हे नोंद झाले आहेत, हे ही खरे आहेत काय,

(३) तसेच सदर गुन्ह्याच्या नोंदीत केवळ त्यांचे कार्यक्षेत्रातील पिडीतांचेच जबाब नोंदवले जात असल्याने, राज्यातील इतर ठिकाणच्या गुंतवणूकदारांना त्याची फसवणूक झाल्याबाबत गुन्हे नोंद करून घेण्यास टाळाटाळ होत असल्याची

बाब माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान  मा. मुख्यमंत्री यांना गुंतवणूकदारानी दिलेल्या निवेदनावरून निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर निवेदनामध्ये पिडीत गुंतवणूकदारांनी त्यांचे बीटकॉईन परत मिळणे तसेच सदर गुन्ह्यातील ७ स्टार म्हणून संबोधित केलेल्या सर्व गुन्हेगारांना अटक करणे, सदर गुन्हा संघटीत स्वरूपाचा असल्याने तसेच १० पेक्षा अधिक

आरोपी असल्याने त्यांचेवर मोक्का कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करणे अशा विविध मागण्या केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर मागण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०१-२०१९) :** (१), (२), (३), (४) व (५)

बिटकॉईन व्दारे गुंतवणुकदारांच्या झालेल्या फसवणुकीबाबत विविध गुंतवणुकदारांकडून संपूर्ण राज्यातून तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. त्यानुसार राज्यात यवतमाळ, ठाणे शहर, पुणे शहर, नांदेड, नागपूर शहर, कोल्हापूर, नवी मुंबई, नाशिक शहर व रायगड या पोलीस घटकात एकूण १५ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यापैकी ६ गुन्हे तपासाधिन आहेत तर ९ गुन्हयात आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे व फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १७३(८) प्रमाणे तपास सुरु आहे. बिटकॉईन संदर्भात दाखल असलेल्या विविध गुन्हयांचा तपास अप्पर पोलीस महासंचालक (आर्थिक गुन्हे) महाराष्ट्र राज्य यांचे स्तरावर विशेष तपास पथकामार्फत करण्यात यावा असे निर्देश शासनाने दि.२५/७/२०१८ च्या पत्रान्वये दिले आहेत.

गुन्हयातील तपासाच्या अनुषंगाने मे.सार्थ ॲण्ड असोसिएशन, मुंबई या संस्थेची फॉरेन्सिक ऑडीटर म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पिंपळगाव (ता.आंबेगाव,जि.पुणे) येथील एका अपंग व्यक्ती व त्याच्या कुटुंबाला स्थानिक गुंडानी केलेली मारहाण

**(२०) १२४००२ (०३-०८-२०१८) श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री.हुसेन कासम शेख (अपंग, अस्थिव्यंग) रा.पिंपळगाव तर्फे घोडे (ता.आंबेगाव,जि.पुणे) यांच्यावर व कुटुंबावर स्थानिक गुंडानी दोनवेळा प्राणघातक हल्ला केल्याप्रकरणी त्यांनी मंचर पोलीस स्टेशन (ता.आंबेगाव,जि.पुणे) यांच्याकडे दिनांक १० मार्च,२०१८ रोजी वा त्या सुमारास तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी मा. स्थानिक लोकप्रतिनिधीनी जिल्हा पोलीस अधिक्षक,पुणे यांच्याकडे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान पत्र दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत तक्रार करुन सुध्दा संबंधित गुन्हेगारांवर कोणतीच कारवाई केली गेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(५) असल्यास, अपंग अधिनियमानुसार गुन्हेगारांवर कारवाई करण्याबाबत अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०१-२०१९) :** (१), (२), (३), (४) व (५)

श्री.शेख यांच्यावर दिनांक ६/०१/२०१८ रोजी अज्ञात वाहनाने ठोस मारल्याप्रकरणी मंचर पो.स्टे. येथे गु. र.नं.२७/२००८, भादंवि कलम २७९, ३३७, ३३८, ४२७ मोटर वाहन कायदा कलम १८४, १३४ (ए) (बी) प्रमाणे गुन्हा दाखल आहे. तसेच दोन अनोळखी इसमांनी दिनांक २८/१२/२०१७ रोजी श्री.शेख यांच्यावर हल्ला केल्याप्रकरणी घोडेगाव पोलीस स्टेशन येथे गु. र.नं.९२/२०१८ भादंवि कलम ३२४, ३३७, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्यांचा तपास चालू आहे.
(६) प्रश्न उद्भवत  नाही.

---

**टागोर नगर (विक्रोळी (पूर्व), मुंबई) येथील हिंदु मृत महिलेची संपत्ती हडपण्यासाठी नावात खाडाखोड करून मुस्लीम दाखवून मुस्लीम कब्रस्थानात दफन केल्याबाबत**

**(२१) १२६३८८ (०४-०८-२०१८) श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टागोर नगर (विक्रोळी (पूर्व), मुंबई) येथील श्रीमती आशाबाई काशीराम मुळे या निराधार हिंदु मृत महिलेची संपत्ती हडपण्यासाठी विक्रोळी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री संजय मोरे यांनी मृत्यूची नोंद न घेता, शव विच्छेदन न करता श्री जलील खान रेतीवाला यांच्या संगनमतमाने आशाबाई चे आयशा बी अशी नावात खाडाखोड करून मुस्लीम दाखवून मुस्लीम कब्रस्थानात दफन केले असल्याची बाब दिनांक २४ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०१-२०१९) :** (१) व (२)  प्रस्तुत प्रकरणी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने सखोल चौकशी करण्यात आली असून, मयत आशाबाई उर्फ आयशाबी ह्या ख्रिश्चन धर्माच्या असल्याची नोंद त्यांचे शाळेच्या सेवापुस्तकात मिळून आली आहे.

मयत महिलेवर उपचार करणाऱ्या डॉक्टर यांनी तिचे मृत्यूचे कारण नैसर्गिक दिल्याने, मयत महिलेचे शवविच्छेदन करण्यात आलेले नाही.

मयत महिलेची सर्व मालमत्ता पंचनामा करुन पोलीस ठाण्यात जमा करण्यात आली असून तिचे झोपडे कुलुप लावून ताब्यात घेण्यात आले आहे.

सदर प्रकरणी श्री. जलील खान व इतर ५ आरोपींविरुध्द, सदर महिला मुस्लीम नसतांना ती मुस्लीम असल्याची चुकीची माहिती दिली व अप्रमाणिकपणे तथ्य लपवून ठेवले म्हणून, त्यांचेविरुध्द विक्रोळी पोलीस ठाणे येथे अदखलपात्र गु.र.क्र. १९६४/१८ भा.दं.वि. कलम ४१७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर प्रकरण सद्यस्थितीत तपासाधीन आहे.
(३) प्रश्न उद्भवन नाही.

---

**मुंबई, मालाड (पूर्व), कुरारगाव येथील सचिन सावंत यांच्या हत्येच्या चौकशीबाबत**

**(२२) १२६४४२ (०५-१२-२०१८) श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुरारगाव, मालाड (पूर्व), (जि.मुंबई उपनगर) येथील श्री. सचिन सावंत हत्या प्रकरणाची केंद्रिय अन्वेषण विभाग (सीआयडी) कडून चौकशी करणे आणि श्री. राजा ठाकरे यांची विशेष सरकारी वकील म्हणून नेमणूक करण्याचे मा. मुख्यमंत्री महोदयांनी नागपूर येथे दिनांक १८ जुलै, २०१८ रोजी वा त्या सुमारास आश्वासन देऊनही अद्याप यावर शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात न आल्याने यांसदर्भात लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री महोदयांना दिनांक २७ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने गंभीर दखल घेऊन, सदरहू प्रकरणाचा तपास करून यातील दोषींना अटक करण्याच्या दृष्टीने अद्यापपर्यंत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०१-२०१९) :** (१) व (२) होय,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचेकडुन या संदर्भात दिनांक १६.१०.२०१८ रोजी प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने विधि व न्याय विभागाच्या अधिसूचना दिनांक १७.११.२०१८ अन्वये ॲड श्री. राजा ठाकरे यांची या प्रकरणी विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदर गुन्ह्यामध्ये एकुण सात आरोपीतांना दिनांक ०८.०५.२०१८ रोजी अटक करण्यात आली आहे. या प्रकरणी मा. दिंडोशी सत्र न्यायालय, बोरीवली विभाग, मुंबई या न्यायालयात खटला सुरु असून त्याचा सेशन केस क्रमांक २५९/२०१८ असा आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नालासोपारा (मुंबई) व नवी मुंबई परिसरामधील अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या संशयीताला अटक केल्याबाबत**

**(२३) १२६६७३ (०६-१२-२०१८) श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नालासोपारा (मुंबई) व नवी मुंबई परिसरामध्ये गत २ वर्षापासून १७ पेक्षा जास्त अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या संशयीताला पोलिसांनी दिनांक २६ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास अटक केली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनूसार संबंधीतांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

वि.स. ५३२ (२०)

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०१-२०१९)** : (१) अल्पवयीन मुलींवरील बलात्काराच्या प्रकरणात पोलीस अधिक्षक, पालघर व पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांचे कार्यक्षेत्रात अनुक्रमे ०३ व ०८ असे एकूण ११ गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. नमूद गुन्ह्यातील संशयित आरोपीस नवी नुंबई पोलीस आयुक्तालय अंतर्गत कोपरखैरणे पोलीस ठाणे येथे गु.र.नं. २५६/१७ अन्वये दाखल गुन्ह्यात दिनांक २७/०९/२०१८ रोजी अटक करण्यात आली आहे.

(२) फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून दाखल गुन्ह्यांबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे-
पोलीस अधिक्षक, पालघर

१) तुळींज पोलीस ठाणे - गुरनं. ९५७/२०१८ भादवि कलम ३६३,३७६,३६८ सह पोक्सो कलम ३,४, ७,८

२) तुळींज पोलीस ठाणे - गुरनं ९८१/२०१८ भादवि कलम ३५४,५०६ सह पोस्को कलम ८,१२

३) तुळींज पोलीस ठाणे - गुरनं. १००३/२०१८ भा.दं.वि. कलम ३६३ सह पोस्को कलम ४
प्रमाणे ०३ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालय :-

१) तळोजा पोलीस ठाणे - गुरनं. १३/२०१५ भादवि कलम ३६३,३५४,३६८ सह पोक्सो कलम ७,८

२) एपीएमसी पोलीस ठाणे- गुरनं २२६/२०१७ भादवि कलम ३६३, ३७६,५०६ सह पोस्को कलम ४,१२

३) कोपरखैरणे पोलीस ठाणे- गुरनं. २५६/१७ भादंवि कलम ३६३, ३७६, ५०६(२) सह पोस्को कलम ४,८

४) एपीएमसी पोलीस ठाणे- गुरनं १६८/२०१८ भादंवि कलम ३६३,३५४ अ,५११ सह पोस्को कलम ११,१२

५) नेरूळ पोलीस ठाणे- गुरनं १०५/२०१८ भादवि कलम ३५४,३६३ सह पोस्को कलम ८

६) रबाळे पोलीस ठाणे- गुरनं २२६/२०१८ भादंवि कलम ३५४(ब),३६३,३२३,५०४,५०६ सह पोस्को कलम ७,८

७) खारघर पोलीस ठाणे- गुरनं. २५०/२०१७ भा.दं.वि. कलम ३५४ अ, ३६३ सह पोस्को ७,८

८) रबाळे पोलीस ठाणे- गुरनं १८३/२०१७ भादंवि कलम ३५४(ब),३६३,५०६ सह पोस्को कलम ७,८

प्रमाणे ०८ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. दाखल गुन्ह्यातील अ.क्र. १ ते ६ मधील गुन्ह्यात आरोपीचा ताबा घेण्यात आला असून दाखल गुन्ह्यांचा पुढील पोलीस तपास चालू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील कांदिवली चारकोप येथील ऑक्सफर्ड पब्लिक स्कूल मध्ये विद्यार्थीनीचा झालेला विनयभंग

**(२४) १२६६८४ (०६-१२-२०१८). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संजय कदम (दापोली), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.मधुसूदन केंद्रे (गंगाखेड), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कांदिवली चारकोप (मुंबई) सेक्टर क्र.५ येथील ऑक्सफर्ड पब्लिक स्कूलमध्ये सहाव्या इयत्तेत शिकणारी विद्यार्थीनी शाळेत आली असताना एका विद्यार्थ्याने तिचा विनयभंग केल्याचे दिनांक ३० ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची तक्रार पिडीत विद्यार्थीनीने शाळेच्या मुख्याध्यापिकेकडे केली असता या गोष्टीकडे दुर्लक्ष करुन विद्यार्थीनीलाच दमदाटी करुन शांत केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, पिडीत विद्यार्थीनीची आई चारकोप पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यास गेली असता पोलीस कुमक उपलब्ध नसल्याने आठ तासानंतर पोलिसांनी तक्रार दाखल करुन घेतली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने सदर शाळेतील मुख्याध्यापिकेवर, पिडीत मुलींची छेड काढणाऱ्या विद्यार्थ्यांवर तसेच तक्रार दाखल करण्यास विलंब करणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यांत येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०१-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) पिडीतेच्या आईच्या तक्रारीवरून चारकोप पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.नं. ३४२/१८ भा.द.वि. कलम ३५४ सह बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक अधिनियम, २०१२ (पोस्को) चे कलम ८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणातील विधीसंघर्षग्रस्त बालक

यास ताब्यात घेवून मा. बालन्यायालय, डोंगरी यांच्या समक्ष उभे केले. सदर गुन्ह्याचा तपास पुर्ण करून मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. सद्यस्थितीत सदर गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र सायबर विभागाने हाती घेतलेल्या अफवांविरोधातील विशेष मोहिमेबाबत**

**(२५) १२६६९६ (०५-१२-२०१८) श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अफवा पसरविणे हा गुन्हा असून महाराष्ट्र सायबर विभागाने अफवांविरोधी माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान विशेष मोहिम हाती घेतली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मोहिमेतंर्गत अद्यापपर्यंत किती जणांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे,
(३) असल्यास, यांस प्रतिबंधीत करण्यासाठी शासनाने कोणत्या विशेष उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०१-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) राज्यातील पोलीस घटकांनी जिल्ह्यांनी खालीलप्रमाणे कारवाई केलेली आहे.
१. लातूर जिल्हयांतील औराद शहाजानी पोलीस ठाणे येथे १२ आरोपीविरुध्द कलम १४३, १४७, १४८,१४९,३०७,१८६,३५३,४३५,४२७ भादंवि सह २७ सार्व. मालमत्ता नुकसान कायदा सह कलम १३५ मपोका अन्वये कारवाई करण्यात आली.
२. बीड जिल्हयातील माजलगांव ग्रामीण पोलीस ठाणे येथे ५ ते ६ अज्ञात आरोपीविरूध्द कलम १४७,१४८,३२३ भादंवि अन्वये कारवाई करण्यात आली.
ii) बीड जिल्हयातील माजलगांव ग्रामीण पोलीस ठाणे येथे ३ आरोपीविरुध्द ३३२, ५०४, ५०६, ३४ भादंवि अन्वये कारवाई करण्यात आली.
iii) बीड जिल्हयातील पेठबीड पोलीस ठाणे येथे एका इसमाविरुध्द कलम ५०५ (१) भादवि अन्वये कारवाई करण्यात आली.
iv) बीड जिल्हयातील बीड ग्रामीण पोलीस ठाणे येथे ३ ते ४ इसमाविरुध्द कलम ५०४, ५०६, ३४ भादंवि अन्वये कारवाई करण्यात आली.
३. हिंगोली जिल्हयातील बासंबा पोलीस ठाणे येथे एक अदखलपात्र गुन्हा नोंद असून एका इसमाविरुध्द १०७ फौदंप्रसं अन्वये कारवाई करण्यात आली आहे.
४. जालना जिल्हयातील मंठा पोलीस ठाणे येथे १० ते १४ अनोळखी इसमांविरुध्द कलम १४३, १४७, १४९, ३२३, ५०४ भादंवि अन्वये कारवाई करण्यात आली.

५. नांदेड जिल्ह्यातील नांदेड ग्रामीण पोलीस ठाणे येथील १० ते १५ अज्ञात इसमांविरुध्द कलम १४३, १४७, १४९, ३२३,३२४, ५०४ भादंवि सह कलम १३५ मपोका. अन्वये कारवाई करण्यात आली.

६. नंदुबार जिल्ह्यातील म्हासावद पोलीस येथे ८ इसमांवर कलम ३०७, ३३२, ३५३, ४२७, १४३, १४४, १४५, १४७, १४८, १४९ भादंवि सह मपोका कलम ३७(१) (३), १३५ मपोका तसेच क्रि.लॉ. ॲक्ट कलम ७ अन्वये कारवाई करण्यात आली.

७. सोलापूर शहरातल एमआयडीसी. पोलीस ठाणे याठिकाणी ५ इसमांविरुध्द कलम १४३, १४७, १४९, ३२३ भादंवि सह १३५ मपोका. अन्वये कारवाई करण्यात आली आहे.

८. परभणी जिल्ह्यातील कोतवाली पोलीस ठाणे येथे १५ ते २० अनोळखी इसमांविरुध्द कलम १४३, १४७, १४९, ३२३, ५०४, ५०६ भादंवि अन्वये कारवाई करण्यात आली.

९. नाशिक जिल्ह्यातील मालेगांव कॅम्प पोलीस ठाणे येथे ३ अज्ञात महिलाविरुध्द कलम ३६३, ५११ भादंवि अन्वये कारवाई करण्यात आली.

ii. नाशिक जिल्ह्यातील पवारवाडी पोलीस ठाणे येथे ४ इसमांविरुध्द कलम १४३, १४९, ४२७ भादंवि अन्वये कारवाई करण्यात आली.

iii. नाशिक जिल्ह्यातील आयशानगर पोलीस ठाणे येथे २ अनोळखी इसमांविरुध्द ३६३, ५११, ३४ भादंवि अन्वये कारवाई करण्यात आली.

iv. नाशिक जिल्ह्यातील सिन्नर पोलीस ठाणे येथे १ इसमांविरुध्द कलम ३६३- अ, ५११, ३४ भादंवि अन्वये कारवाई करण्यात आली.

v. नाशिक जिल्ह्यांतील मालेगांव शहर पोलीस ठाणे येथे एका इसमांविरुध्द कलम ३६३-अ, ५११, ३४ भादंवि अन्वये कारवाई करण्यात आली.

१०. औरंगाबाद शहरातील बैजापूर पोलीस ठाणे येथे ८ इसमांविरुध्द कलम ३०२, ३०७, ३५३, १४३, १४७, १४९, १८८ भादंवि सह १३५ मपोका अन्वये कारवाई करण्यात आली.

११. चंद्रपूर जिल्ह्यांतील पोभुर्णा पोलीस ठाणे येथे एका इसमांविरुध्द कलम ३२४ भादंवि अन्वये कारवाई करण्यात आली.

१२. गोंदिया जिल्ह्यातील गोरेगांव पोलीस ठाणे ११ इसमांविरुध्द कलम १४३, १४७, १४८, १४९ भादंवि अन्वये कारवाई करण्यात आली.

१३. (a) ठाणे शहरातील बाजारपेठ पोलीस ठाणे येथे ४ इसमांविरुध्द कलम ३२६, ३५३, २०१, ३६४, १४३, १४७, १४९ भादंवि अन्वये कारवाई करण्यात आली.

(b) ठाणे शहरातील भोवाडा पोलीस ठाणे येथे एका इसमांविरुध्द ३२३ भादंवि अन्वये कारवाई करण्यात आली.

१४. औरंगाबाद शहर छावणी पोलीस ठाणे येथे ४ इसमांविरुध्द कलम ३०२, ३०७, १४३, १४७, १४८, १४९, ३४१, ३२४ भादंवि अन्वये कारवाई करण्यात आली.

(३) समाज माध्यमाव्दारे प्रसारीत होणाऱ्या अफवा थांबविण्यासाठी सर्व पोलीस आयुक्त पोलीस अधीक्षक यांनी विविध प्रकारचे जनजागृती कार्यक्रम आखून त्यांना प्रसार माध्यमाव्दारे तसेच राज्यातील विविध शहरात मुख्य ठिकाणी फलकावर इन्फोग्राफीक्स लावून प्रसिध्दी दिली असून परिस्थती आटोक्यात आणण्याचे व लोकांना अफवांना बळी न पडण्याबाबत अवाहन केले आहे. तसेच महाराष्ट्र सायबर तर्फे सर्व जिल्हयाकरीता ॲडव्हायझरी पाठविण्यात आली आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

**नक्षलवाद्यांशी संबंध असल्याच्या संशयावरुन पुणे पोलीसांनी सुरु केलेल्या अटक सत्राचा तपशिल प्रसिध्दी माध्यमांसमोर उघड केल्याबाबत**

**(२६) १२६७१६ (०६-१२-२०१८) श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नक्षलवाद्यांशी संबंध असल्याच्या संशयावरुन पुणे पोलीसांनी सुरु केलेल्या अटक सत्राचा तपशिल पोलीसांनी प्रसिध्दी माध्यमांसमोर दिनांक ३१ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास उघड केला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एखादे प्रकरण न्यायप्रविष्ट असताना त्याबाबतची महिती प्रसार माध्यमांसमोर उघड केल्याप्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दिनांक ३ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास नाराजी व्यक्त केली, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी अधिक चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार याप्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०१-२०१९) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

दिनांक २८.०८.२०१८ रोजी सदर गुन्हयाच्या तपासा दरम्यान देशभरात हैद्राबाद, दिल्ली, ठाणे, मुंबई, फरिदाबाद व गोवा या ठिकाणी झडती घेवून, ५ आरोपींना अटक केल्यानंतर दि.२९.०८.२०१८ रोजी एका याचिकेद्वारे मा. सर्वोच्च न्यायालयाने सर्व आरोपींना हाऊस अरेस्टमध्ये ठेवण्याचे आदेश पारित केले होते. त्यानंतर मा. न्यायालयाचे आदेशाचे प्रसारमाध्यमांमध्ये व सोशल मिडीयामध्ये चूकीच्या पध्दतीने अर्थ घेवून आरोपींची अटक चूकीची / पुराव्या अभावी असल्याचे मांडणी केली जात होती. त्यामुळे सर्व सामान्य जनतेच्या मनात शासना विरोधात रोष निर्माण करण्याचा प्रयत्न सोयीस्कररित्या केला जात असल्याने, महाराष्ट्र शासन व पोलीसांची बाजू योग्य पध्दतीने मांडण्याकरीता सदरची पत्रकार परिषद घेण्यात आली होती.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबई शहरातील वाढत्या गुन्हेगारीला प्रतिबंधित करण्यासाठी पोलीस दल तसेच बीट चौक्यांची संख्या वाढविण्याबाबत**

**(२७) १२६७७० (०६-१२-२०१८) श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई शहरातील वाढत्या गुन्हेगारीला प्रतिबंधित करण्यासाठी पोलीस दल तसेच बीट चौक्यांची संख्या वाढविण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य यांचेकडे शासनाने सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावावर पोलीस महासंचालक यांनी निर्णय घेतला आहे काय,

(३) असल्यास, निर्णयाचे थोडक्यात स्वरूप काय आहे व त्यानुसार पोलीस दल व बीट चौक्याची संख्या वाढविण्याबाबत शासन स्तरावरून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०१-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य शासनाने १५४ फौजदारपदावर केलेल्या पदोन्नत्या मॅटने बेकायदेशिर ठरविल्याबाबत**

**(२८) १२७२७६ (०६-१२-२०१८) श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य सरकार कायदा करीत नाही तो पर्यंत पदोन्नतीतील आरक्षण बेकायदा आहे, असे स्षष्ट करीत १५४ पोलिसांना फौजदारपदी दिलेली पदोन्नती महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने (मॅट) बेकायदा ठरवून करण्यात आलेली पदोन्नती रद्द केली तसेच या फौजदारांच्या नियुक्त्याही रोखल्या असून त्यांना त्यांच्या मूळ जागी नियुक्त करावे असा आदेश मॅटने दिला असल्याची माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निर्देशनास आले आहे, हे खरे आहे

(२) असल्यास, ज्या १५४ पोलीसांना उपनिरिक्षक पदावर पदोन्नती देण्यात आली होती त्यांनी नाशिकच्या प्रशिक्षण केंद्रात आपले प्रशिक्षण पुर्ण केल्याने ते लवकरच पोलीस उपनिरिक्षक पदी रुजू होणार होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

वि.स. ५३२ (२६)

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०२-२०१९) :**(१), (२), (३) व (४) सदरहू १५४ उमेदवारांचे पोलीस उपनिरीक्षक पदाचे प्रशिक्षण झालेले असून त्यांना त्या पदावर नियुक्ती देण्यात यावी असे आदेश शासनाच्या दि.१९/११/२०१८ च्या पत्रान्वये पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना कळविण्यात आले आहेत.

---

**राज्यातील मैत्रेय या कंपनीतील गुंतवणूकदारांचे पैसे परत मिळण्याबाबत**

**(२९) १२७३२२ (०६-१२-२०१८) श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मैत्रेय या कंपनीत अनेक ठेवीदारांचे पैसे अडकले असून मुदत पूर्ण झाल्यानंतरही पैसे परत मिळत नसल्याने गुंतवणूकदार अडचणीत आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, न्यायालयाने या कपंनीची मालमत्ता जप्त करुन ती विक्री करावी व गुंतवणूकदारांचे पैसे परत द्यावे, असे आदेश दिले आहेत मात्र शासनाने अद्याप अंमलबाजवणी केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करुन या कंपनीतील ठेवीदारांचे हक्काचे पैसे त्यांना मिळवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०१-२०१९) :** (१), (२) व (३) सदर प्रकरणी ठेवीदारांच्या तक्रारींच्या अनुषंगाने राज्यातील विविध पोलीस घटकांमध्ये मैत्रेय समूह विरुध्द एकूण ३० गुन्हे दाखल आहेत. या सर्व गुन्ह्यांच्या तपासात समन्वय राखण्यासाठी अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके यांच्यामार्फतीने संनियंत्रण होत आहे.

महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ कायद्यान्वये शासनामार्फत दिनांक २९.११.२०१७, दिनांक ७.४.२०१८ व दिनांक १.६.२०१८ अन्वये सदर गुन्ह्यातील कंपनीच्या मालकीच्या एकूण ३०८ मालमत्ता व १७ जंगम मालमत्ता अधिसूचित करण्यात आल्या आहेत. सदर मालमत्तेच्या विल्हेवाटीकरिता स्वतंत्र सक्षम प्राधिकारी यांची नेमणूक करण्यात आली आहे. सदर कंपनीची महाराष्ट्रातील व इतर राज्यातील उर्वरित मालमत्ता शोधून ती जप्त करण्याची कारवाई करण्यात येत आहे.

मा. न्यायालयाचे आदेशान्वये दिनांक १५.३.२०१६ रोजी एस्क्रो खाते एक्सीस बँक, गंगापूर रोड, शाखा नाशिक येथे उघडले असून, एस्क्रो खातेमधून अद्यापपर्यंत एकूण ९९४७ ठेवीदारांना रु. ८,०९,४०,८४९/- इतक्या रक्कमेचे वाटप करण्यात आले आहे.

ज्या ठेवीदारांनी रक्कमांची मागणी अद्याप दाखल केलेली नाही, अशा गुंतवणूकदारांनी संबंधीत जिल्ह्याच्या आर्थिक गुन्हे शाखेशी संपर्क साधून त्यांच्या ठेवींच्या मागणीबाबत विहित नमून्यात अर्ज भरुन देण्याबाबत शासन स्तरावरुन दिनांक ३.११.२०१८ च्या पत्रान्वये सर्व पोलीस घटकांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

सदर गुन्ह्यांचा तपास अद्याप सुरु असून जप्त केलेल्या मालमत्तेची कायदेशीर विल्हेवाट लावण्यासाठी न्यायालयीन प्रक्रिया सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत  नाही.

---

**मुंबईतील जूहू, कोळीवाडा येथील खार फूटीमध्ये जप्त केलेली वाहने ठेवली जात असल्याबाबत**

**(३०) १२७७१३ (०६-१२-२०१८) श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संजय कदम (दापोली), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.मधुसूदन केंद्रे (गंगाखेड), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खारफूटीला संरक्षणाचा दर्जा दिलेला असतानाही मुंबईतील जूहू, कोळीवाडा येथील खार फूटीमध्ये खार, सांताक्रुझ, जुहू येथील परिसरातील पोलिसांनी जप्त केलेली वाहने आणून ठेवली जात असल्यामुळे खारफुटीची हानी होत असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०१-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) सदरची जागा मौजे जुहू कोळीवाडा सर्व्हे नं. ७२ व ७८ न.भु.क्र. १२१४ ही महसूल व वन विभागाची मोकळी जागा असून सदर जागेवर खार, सांताक्रुझ, जुहू पोलीस ठाणे यांनी जप्त केलेली वाहने तात्पुरत्या स्वरुपात आणून ठेवलेली आहेत.

सदरचे क्षेत्र अधिसूचित राखीव कांदळवन क्षेत्रापैकी नाही.

(३) प्रश्न उद्भवत  नाही.

---

## पुणे येथे अभियांत्रिकीचे शिक्षण घेणा-या तरुणीवर मुंबई येथे झालेला अत्याचार

**(३१) १२७७९० (०६-१२-२०१८) श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथे अभियांत्रिकीचे शिक्षण घेणा-या तरुणीला मुंबईमध्ये बोलावून तिला महिनाभर घरात डांबून तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा प्रकार मुंबई शहरातील ओशिवरा येथे माहे सप्टेंबर, २०१८ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मुलीने मुस्लीम धर्म स्वीकारावा यासाठी तिच्यावर लैंगिक अत्याचार करण्यात येऊन तिला घरात डांबून ठेवून आक्षेपार्ह ४० अश्लिल क्लिप बनविल्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी ओशिवरा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०२-२०१९) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून ओशिवरा पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.नं. ३९३/२०१८ कलम ३७६, ३७७, ३९२, ३५४, ३५५, ३२४, ३२८, ३४२, ३४४, ३४७, ५०६, ३४ भा.दं.वि.सह कलम ६६ (ई) माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० प्रमाणे आरोपीतांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्यातील मुख्य आरोपी क्र.१ यास अटक करण्यात आली असून सध्या न्यायालयीन कोठडीत आहे. महिला आरोपी क्र. २ ला मा. न्यायालयाच्या आदेशाने अटकपूर्व जामीनावर मुक्त केले आहे. सद्यस्थितीत सदर गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र राज्य सुरक्षा मंडळाने भरती केलेल्या ५ हजार प्रतिक्षाधीन सुरक्षा रक्षकांना सेवेत सामावून घेण्याबाबत

**(३२) १२८३१० (०७-१२-२०१८) श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा. न्यायालयाने महाराष्ट्र राज्य सुरक्षा मंडळाला सुरक्षा रक्षकांची भरती करण्याचे आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंडळाने भरती केलेल्या ५ हजार सुरक्षा रक्षक अद्यापी प्रतिक्षेत ठेवले असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार प्रतिक्षाधीन सुरक्षा रक्षकांना सेवेत सामावून घेण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०१-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्ह्यातील 'उर्दू घर' या इमारतीबाहेर समाजकंटकांचा वावर होत असल्याबाबत**

**(३३) १२८५३१ (०७-१२-२०१८) श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यात रुपये ९ कोटी एवढे खर्चून वातानुकूलित कक्ष, अभ्यासिका, सभागृह, ग्रंथालय यासह अनेक सुविधांयुक्त असे उर्दू घर उभारण्यात आले, परंतु या इमारतीबाहेर काही लोकांनी गैरवापर सुरु केला आहे, इमारती बाहेर पत्ते खेळण्यात येत असून तेथे दारुच्या बाटल्या व इतर आक्षेपार्ह वस्तू सापडल्या असून मागील काही दिवसांतच या उर्दूघराला आग लागल्याची बाब दिनांक १३ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनस्तरावरुन चौकशी करण्यात आली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणत्या स्वरुपाची कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०२-२०१९) :** (१) व (२) सदर प्रकरणी कोणी तरी अज्ञात चोरट्यांनी उर्दू घरात प्रवेश करून एकुण रू.७,७७,९३९/- किंमतीचे साहित्य चोरून नेल्याच्या तसेच आग लावून एकुण रू.१,६८,७५४/- किंमतीच्या साहित्याचे नुकसान केल्याच्या तहसिलदार नांदेड यांच्या फिर्यादीवरून दि.२६/०५/२०१८ रोजी इतवारा पोलिस स्टेशन, नांदेड येथे गु.र.क्र. १३९/२०१८ भा.दं.वि.कलम ४५४, ४५७, ३८०, ४२७ प्रमाणे अज्ञात आरोपींविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सद्यस्थितित गुन्हा तपासावर आहे.
(३) विलंब झालेला नाही.

---

**मणेराजुरी (ता.तासगांव, जि. सांगली) येथील द्राक्ष शेतकऱ्यांचे झालेले नुकसान**

**(३४) १२८६२५ (०६-१२-२०१८) श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मणेराजुरी (ता.तासगांव, जि. सांगली) येथील दहा शेतकऱ्यांचे सुमारे ५८ लक्ष ५१ हजार रुपयांचे द्राक्ष घेऊन काही व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांना द्राक्षांचे पैसे अजुनही दिले नसल्याची तक्रार दिनांक २५ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास पोलिस स्टेशनमध्ये केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, तद्नुसार १० शेतकऱ्यांच्या द्राक्षाची रक्कम व्यापाऱ्यांकडून मिळवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०२-२०१९) :** (१), (२) व (३) याप्रकरणी फिर्यादी व इतर शेतकरी यांची एकुण रू.५८,५४,९३९/- रूपयांची फसवणूक केल्या प्रकरणी ४ आरोपींविरूध्द तासगाव पोलीस स्टेशन येथे दि.२४/०९/२०१८ रोजी भाग ५ गु.र.नं. ३६४/२०१८ भा.दं.वि.स. कलम ४२०, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून ३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. अटक आरोपींकडून एकुण रू. ८,३०,००० किंमतीची २ वाहने जप्त करण्यात आली आहेत. याप्रकरणातील फरारी आरोपीचा शोध घेणे व गुन्ह्यातील फसवणुकीची रक्कम हस्तगत करण्याच्या दृष्टीने सदर गुन्हा तपासावर आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

**अचकनहळ्ळी (ता. जत, जि.सांगली) येथील घरावर पडलेला सशस्त्र दरोडा**

**(३५) १२८६३२ (०७-१२-२०१८) श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अचकनहळ्ळी (ता. जत, जि.सांगली) येथील श्री. दिलीप तुकाराम शिंदे यांच्या घरावर सशस्त्र दरोडा घालून दागिन्यांसह १ लाख ६१ हजार रुपयांचा मुद्देमाल दरोडेखोरांनी दिनांक २० ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास पळवून नेला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दरोडेखोरांनी घरातील स्त्रियांसह ५ लोकांना जबर मारहाण करुन त्यांना जिवे मारण्याची धमकी दिल्यामुळे त्या परिसरात भितीचे वातावरण पसरले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दरोडेखोरांना अटक करून त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येणार

आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०२-२०१९) :** (१), (२) व (३) सदर प्रकरणी दि.२०/०९/२०१८ रोजी रात्री अज्ञात ८ ते ९ आरोपींनी घरात घुसून फिर्यादी व त्यांचे ४ कुटुंबिय यांना मारहाण करून जखमी करून सोन्या चांदीचे दागिने व रोख रक्कम रू.४,०००/- असा एकुण रू.१,६१,५००/- चा ऐवज चोरून नेल्याबाबत प्राप्त फियादीवरून जत पोलीस ठाणे येथे सी सी टी एन एस गु.र.क्र.३३५/२०१८ (भाग-५ गु.र.क्र.२५४/२०१८) भा.दं.वि.स.कलम ३९५, ३९७, ४२७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत गुन्हा तपासावर आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

**श्रीगोंद्याचे (जि.अहदमनगर) पोलीस निरिक्षक आरोपींना पाठीशी घालत असल्याबाबत**

**(३६) १२८८१८ (०७-१२-२०१८) श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गार (ता.श्रीगोंदा,जि.अहदमनगर) येथील ८ महिन्यांची गरोदर असलेली महिला श्रीमती अमृता लोखंडे व नागलवाडी (ता.कर्जत,जि.अहदमनगर) येथील श्रीमती कविता डाडर या दोन्ही महिलांचा संशयास्पद मृत्यु झाला असल्याची तक्रार त्यांच्या कुटुंबियांनी संबंधित पोलीस ठाण्यात माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित पोलीस निरिक्षक यासंबंधात योग्य कारवाई करीत नसून ते आरोपींना पाठीशी घालत असल्याची तक्रार तेथील एका सामाजिक संस्थेने पालकमंत्री, गृह राज्यमंत्री व विरोधी पक्षनेते विधानसभा यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार संबंधित दोषींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०२-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) लहुजी शक्ती सेना, महाराष्ट्र राज्य ,पुणे या संस्थेने श्रीमती कविता डाडर, रा. नागलवाडी, ता. कर्जत जि. अहमदनगर हिचे मृत्यू प्रकरणी संबंधितांना निवेदने केली आहेत.
(३) फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून दाखल केलेल्या गुन्ह्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे -
घटना क्र. १ - महिला अमृता लोखंडे हिचे मृत्युबाबत श्रीगोंदा पोलीस स्टेशन, जि. अहमदनगर येथे गु.र.नं. ३४०/२०१८ भा.द.वि. कलम ४९८ (अ), ३०६, ३०४(ब), ३४ प्रमाणे आरोपीतांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपी क्र. १ व २

यांचा मा. न्यायालयाने अटकपुर्व जामिन मंजूर केला आहे. सदर गुन्ह्यात एकूण ८ साक्षीदार तपासण्यात आलेले असून सदर गुन्हा पोलीस तपासावर आहे.
घटना क्र. २ - श्रीमती कविता डाडर हिचे मृत्युबाबत श्रीगोंदा पोलीस स्टेशन, जि. अहमदनगर येथे गु.र.नं. ३६६/२०१८ भा.द.वि. कलम ३०२, २०१ अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा कलम ३(२) (व्ही) प्रमाणे आरोपीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपीस अटक करण्यात आली असून सध्या आरोपी हा न्यायालयीन कोठडीत आहे. सद्यस्थितीत सदर गुन्हा पोलीस तपासावर आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**लासलगांव (ता. निफाड, जि. नाशिक) येथे होत असलेल्या अवैध दारु व गुटखा विक्रीबाबत**

**(३७) १२८८५३ (०७-१२-२०१८) श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लासलगांव (ता. निफाड, जि. नाशिक) येथील बाजारतळात विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणात अवैध दारु व गुटखा विक्री सुरु असून महाविद्यालयीन यूवक या धंद्यात गुरफटले जात असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मटका, जुगार यांसारखे अवैध धंदे कायमस्वरुपी बंद करुन लासलगाव पोलिसांनी परिसरात शांतता व सलोखा निर्माण करावा, या ग्रामस्थांच्या मागणीकडेही पोलिस अधिकारी दुर्लक्ष करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नूसार लासलगाव येथील अवैध धंदे, दारु व गुटखा विक्री बंद करून त्यांची विक्री करणा-यांवर तसेच याकडे दुर्लक्ष करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०२-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही.
लासलगांव परिसरात शांतता व सलोखा निर्माण व्हावा व तो कायमस्वरूपी टिकावा यासाठी अवैध धंद्यांची माहिती काढून वेळोवेळी छापे टाकून अवैध धंद्यांचे समुळ उच्चाटन करण्यासाठी उचित कार्यवाही केलेली आहे.
(३) लासलगाव बाजारतळ परिसरात सन २०१८ मध्ये माहे नोव्हेंबर पर्यंत अवैधरित्या दारू विक्री करणाऱ्या २ आरोपींना अटक करून एकुण रू. ३२८८/- चा मुद्देमाल हस्तगत केला आहे. अवैध धंद्यांची माहिती काढून वेळीच योग्य ती उचित कार्यवाही करण्यात आली आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

## सोलापूर जिल्ह्यातील केम रेल्वे स्थानकाजवळ वाराणसी - म्हैसूर सुपर एक्सप्रेस वर पडलेला सशस्त्र दरोडा

**(३८) १२९३९७ (०७-१२-२०१८) श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील केम रेल्वे स्थानकाजवळ दिनांक ३ व ४ सप्टेंबर २०१८ रोजी वा त्यासुमारास पहाटे क्रॉसिंगसाठी थांबलेल्या वाराणसी-म्हैसूर सुपर एक्सप्रेस वर दरोडेखोरांनी तलवारी व लोखंडी रॉडने गाडीतील प्रवाशांवर हल्ला करून त्यांना लुटण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बाबतचा गुन्हा कुर्डुवाडी रेल्वेमार्ग पोलीस ठाण्यात दाखल केला आहे, हे ही काय,

(३) असल्यास, याप्रकरणी तपास करून दरोडेखोरांना अटक करून त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०१-२०१९) :** (१), (२) व (३) सोलापूर जिल्ह्यातील केम रेल्वे स्थानकाजवळ दिनांक ३ सप्टेंबर २०१८ रोजी वाराणसी-म्हैसूर सुपर एक्सप्रेस पहाटे क्रॉसिंगसाठी थांबलेली असताना चोरटयांनी अंधाराचा फायदा घेवून एका महिलेच्या गळयातील सोन्याचे दागिने व एका महिलेचा मोबाईल असा ऐवज चोरल्याची घटना घडली आहे.

सदर घटनेबाबत कुर्डूवाडी लोहमार्ग पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.१५५/२०१८ भा.दं.वि.स. कलम ३९२, ३४ प्रमाणे दि.०४/०९/२०१८ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्यात ४ आरोपींना अटक करण्यात आली असून सद्यस्थितीत गुन्हा तपासावर आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

## फिनॉमिनल कंपनीच्या माध्यमातून दामदुप्पट करण्याच्या नावाखाली कोल्हापूर जिल्ह्यातील ७०० जणांची केलेली फसवणूक

**(३९) १२९४५२ (०७-१२-२०१८) श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फिनॉमिनल कंपनीच्या माध्यमातून मोफत आयुर्विमा, मोफत वैद्यकिय तपासणी सुविधांसह नऊ वर्षात दामदुप्पटसह मोफत विम्याच्या आमिषाने कोल्हापूर जिल्ह्यातील ७०० जणांची फसवणूक केल्याचा प्रकार माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी १८ संचालकांविरोधात शाहूपुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच गुंतणुकदारांना त्यांची रक्कम परत मिळवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०२-२०१९) :** (१), (२) व (३)

सदर प्रकरणी फिर्यादी व त्यांचेमार्फतीने गुंतवणुक केलेले इतर गुंतवणुकदार यांची फिनॉमिनल कंपनीच्या माध्यमातून मोफत आयुर्विमा, मोफत वैद्यकिय तपासणी सुविधांसह नऊ वर्षात दामदुप्पटसह मोफत विम्याचे आमिष दाखवून एकुण रू.१७,१४,०००/- रूपयांची फसवणूक केली म्हणून तसेच याचप्रकारे इतर ६०० ते ७०० गुंतवणुकदार यांची फसवणूक केल्या प्रकरणी शाहुपूरी पोलिस ठाणे येथे गु.र.क्र.४३६/१८ भा.दं.वि.स. कलम ४०६, ४२०, ४६७, ४६८, ३४ सह महाराष्ट्र ठेविदारांचे (वित्तीय आस्थापनांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम १९९९ चे कलम ३ प्रमाणे १८ आरोपींविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून सद्यस्थितित गुन्हा तपासावर आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

### मालेगाव (जि.नाशिक) शहरातील वाढत्या गुन्हेगारीबाबत

**(४०) १२९५८४ (०७-१२-२०१८). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (जि.नाशिक) शहरातील वाढत्या गुन्हेगारीला प्रतिबंधीत करावे, शहरातून बेपत्ता झालेल्या बालकांचा शोध घ्यावा, अंमली पदार्थ विकणाऱ्यांविरुध्द व्यापक कारवाई करावी या मागणीसाठी येथील इन्सानियत बचाव संघर्ष समितीने अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर माहे सप्टेंबर, २०१८ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या दरम्यान आंदोलन केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून समितीच्या मागणीनुसार मालेगाव शहरातील कायदा व सुव्यवस्था राखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०२-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मालेगाव शहरातील वाढत्या गुन्हेगारीला प्रतिबंध करणे व कायदा व सुव्यस्था राखण्याबाबत मालेगांव शहर उपविभागातील एकुण ८ पोलीस स्टेशन हद्दीत अवैध हत्यार बाळगणे, तलवारी, चाकु सारखे हत्यार बाळगणे अशा विविध गुन्ह्यांमध्ये कोम्बिंग ऑपरेशन, नाकाबंदी यांसारख्या उपाययोजना करुन गुन्ह्यांमध्ये सहभागी आरोपींविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे.

बेपत्ता बालकांच्या शोधासाठी मिसींग पर्सन ब्युरो, रा. गु. अ. वि., पुणे यांना माहिती देण्यात येऊन मालेगांव तसेच आजुबाजुच्या जिह्यातील पोलीस स्टेशन मार्फत शोध घेण्यात आलेला आहे. आजपावेतो झालेल्या तपासामध्ये मानवी तस्करी झाल्याचे निष्पन्न झाले नाही.

महिला व मुलींमध्ये जन जागृती करण्याकरीता 'महिला सुरक्षा कवच योजना' व त्या अंतर्गत 'से नो' कार्यक्रम तसेच, दामिनी पथकामार्फत चर्चा सत्राचे आयोजन, शहरातील शातंता समिती सदस्य, नगरसेवक, जेष्ठ नागरीक तसेच शहरातील सामाजिक कार्यकर्ते व प्रतिष्ठीत नागरीक यांच्या बैठका घेऊन त्यांना शांतता राखण्याचे आवाहन करण्यात आलेले आहे. मिसींग व्यक्तिंचा शोध घेण्याकरीता इलेक्ट्रानिक व प्रिंट प्रसार माध्यमाद्वारे प्रसिद्धी करून जन जागृती करण्यात येत आहे. अंमली पदार्थांची विक्री प्रकरणी २ गुन्हे दाखल करण्यात आले असून यामध्ये ४ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच, गोपनिय माहिती मिळवून केसेस करण्याची कार्यवाही चालू आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

## भायखळा तुरुंगातील ८५ महिला कैद्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आल्याबाबत

**(४१) १२९८५० (०८-१२-२०१८) श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भायखळा तुरुंगातील ८५ महिला कैद्यांना माहे जुलै महिन्यात आजारी पडल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अचानक इतक्या मोठ्या प्रमाणात महिला कैदी आजारी पडण्याचे कारण काय आहेत,

(३) असल्यास, घटनेची पुनरावृत्ती होऊ नये याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०१-२०१९) :** (१) होय.

(२) भायखळा जिल्हा कारागृहामध्ये दि.२०.०७.२०१८ रोजी सकाळी ८७ महिला बंद्यांना साधारणत: मळमळ होणे, उलटीसारखे वाटणे, कोरड्या उलटी होणे ही लक्षणे प्रामुख्याने आढळुन आल्याने त्यांना जे.जे.रुग्णालय, मुंबई येथे दाखल करण्यात आले होते. जे.जे. रुग्णालयातील वैद्यकीय अहवालानुसार ७९ महिला बंदयांना गॅस्ट्रायटीस (gastritis) या आजाराचे निदान झालेले आहे.

जे.जे.रुग्णालयामार्फत प्राप्त अहवालानुसार महिला रुग्ण बंद्यांची लक्षणे ही पावसाळ्यातील हवामान बदलामुळे (Monsoon related illness) झाले असल्याचे नमुद केले आहे.
(३) अशा घटना घडू नये म्हणून कारागृहातील बंद्यांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात येत असलेल्या टाक्या स्वच्छ करण्यात येत असून पाण्याच्या पिण्याचे परिक्षण वेळोवेळी करण्यात येत आहे. तसेच प्रतिबंधक औषधांचे तपासणी व खात्री करुन वाटप करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. कारागृहातील धान्याचा साठा व तयार केलेले जेवण यांची तपासणी रोजच्या रोज करण्यात येत आहे. कैदयांना देण्यात येणाऱ्या आहार व कारागृहातील स्वच्छतेबाबत अधिष्ठाता सर जे.जे.समुह रुग्णालये, मुंबई यांचेकडून समिती गठीत करण्यात आलेली असून सदर समिती प्रत्येक महिन्यातून एकदा अचानकपणे कारागृहास भेट देते. सदर भेटी दरम्यान कारागृहातील सर्व विभागांची पाहणी केली जाते.
(४) निरंक

---

### वानखेड (जि.बुलढाणा ता.संग्रामपुर) या गावातील मतीमंद युवतीवर झालेला अत्याचार

**(४२) १३०७३६ (०८-१२-२०१८) श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वानखेड (जि.बुलढाणा ता.संग्रामपुर) या गावातील बारी समाजातील १८ वर्षीय मतीमंद युवतीवर दिनांक ८ सप्टेंबर २०१८ रोजी वा त्या सुमारास शेजारीच राहणा-या व्यक्तीने लैंगिक अत्याचार केल्याचे निदर्शनास आले आहे , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अत्याचार करणा-या व्यक्तीस कठोरात कठोर शिक्षा झाली पाहीजे व सदर प्रकरण जलतगतीने न्यायालयात चालवून पिडीतीची बाजू शासनातर्फे न्यायालयात मांडण्यासाठी ॲड उज्वल निकम यांची सरकारी वकील म्हणून नियुक्ती करण्यात यावी, या मागणीसाठी दिनांक २८ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास सुमारे हजारो महिलांकडून मुक मोर्चा काढण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हयातील लोकप्रतिनिधींनीही मा. मुख्यमंत्री यांना निवेदन याबाबत कार्यवाही करण्याची मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणाची सखोल चौकशी करून बारी समाज व मा.लोकप्रतिनिधी यांच्या मागणीनुसार त्यांच्या मागण्या पुर्ण करण्यासाठी व पिडीत मुलीला न्याय देण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०२-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून तामगांव पो.स्टे., ता. संग्रामपुर, जि.बुलढाणा येथे गु.र.नं.

१७०/२०१८ कलम ३७६ (२) (L), ४५२, ५०६ भा.दं.वि. (आय), ३६३,३६४,२०१ प्रमाणे आरोपीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्ह्यातील आरोपीस दिनांक १०/०९/२०१८ रोजी अटक करण्यात आली. सद्यस्थितीत सदर गुन्ह्याचे मा. न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी न्यायालय, संग्रामपूर येथे दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून त्याचा कोर्ट केस क्र. ८०/२०१८ असा आहे. सध्या सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी खटला जलदगती न्यायालयात चालविणेबाबत व नामांकित विशेष सरकारी वकीलाची नेमणूक करणेबाबत केलेल्या मागणी संदर्भात संबंधित विभागांना पूढील आवश्यक ती कार्यवाही करणेबाबत कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालिकेच्या पशुवधगृहातील कचरा मानखुर्द डम्पिंग ग्राऊंडवर टाकण्याच्या कंत्राटाची माहिती मागणा-या आरटीआय कार्यकर्त्याने खंडणीची मागणी केल्याबाबत**

**(४३) १३१३९९ (०८-१२-२०१८) श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या पशुवधगृहातील कचरा मानखुर्द डम्पिंग ग्राऊंडवर टाकण्याच्या कंत्राटाची माहिती मागणा-या आरटीआय कार्यकर्त्याने कंत्राटदाराकडून पाच लाख रुपयांची खंडणी मागितल्याप्रकरणी त्यास अटक करण्यात आल्याची बाब माहे जुलै, २०१८ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कार्यकर्त्याची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०१-२०१९) :** (१) हे खरे नाही,
(२), (३) व (४) याबाबत बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्याची नोंद नाही.

---

**बेघर स्वातंत्र्य सैनिक यांना घर बांधणीसाठी रुपये १० लक्ष अर्थसहाय्य मिळणेबाबत**

**(४४) १३१७२९ (१०-१२-२०१८) श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामधील बेघर स्वातंत्र्यसैनिक/स्वातंत्र्यसैनिकांच्या कुटूंबियांस घर बांधकामासाठी रुपये १० लक्ष अर्थसहाय्य देण्याबाबत शासनाकडून शासन परिपत्रक क्र.संकिर्ण १९२६/प्र.क्र.८३/१६/स्वासैक१, दिनांक २८ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास परिपत्रक काढलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उस्मानाबाद जिल्हयातील किती स्वातंत्र्य सैनिक सदरहु योजनेसाठी पात्र ठरलेले आहेत व सदरहु पात्र स्वातंत्र्य सैनिकांचा परिपूर्ण अहवाल शासनाकडे प्राप्त झालेला आहे काय,
(३) असल्यास, सदरहु पात्र स्वातंत्र्य सैनिकांच्या अहवालामधील त्रुटी पूर्ण करण्यासाठी शासनाकडुन मा.जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांस पत्र क्र. संकिर्ण १९१८/ प्र.क्र.३५/२०१८/स्वासैक१ सामान्य प्रशासन विभाग १९ यांनी दिनांक १ मार्च, २०१८ रोजी वा त्या सुमारास पत्रव्यवहार केला होता, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांच्याकडून अहवालातील त्रुटी पूर्ण करुन अहवाल शासनाकडे पाठविण्यास विलंब होण्याचे कारण काय आहेत,
(५) तसेच सदरहू अहवाल प्रलंबीत ठेवणाऱ्यांवर शासनाने कारवाई करण्याबाबत व सदरहु पात्र असलेल्या स्वातंत्र्य सैनिकांस घर बांधणीसाठी रुपये १० लक्ष अर्थसहाय्य देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०२-२०१९) : (**१) होय
(२) परिपूर्ण अहवाल शासनाकडे प्राप्त झालेला नाही.
(३) होय
(४) अर्जदारांनी जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांचेकडे आवश्यक परिपूर्ण कागदपत्रे सादर केलेली नाहीत.
(५) जिल्हाधिकारी,उस्मानाबाद यांना दि.२८/११/२०१८ च्या पत्रान्वये अर्जदारांची परिपूर्ण कागदपत्रे पाठविण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती विभागीय आयुक्त कार्यालयाच्या उद्यानातून चंदनाच्या झाडाची तस्करी करण्यात आल्याबाबत

**(४५) १३१८८८ (१०-१२-२०१८). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती येथील विभागीय आयुक्त कार्यालयाच्या उद्यानातून अज्ञात चोरट्यांनी दिनांक ३० सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास मध्यरात्री चंदनाच्या झाडांची कत्तल केल्याबाबतची तक्रार गाडगेबाबा पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रशासकीय अधिका-यांचे बंगले, निवासस्थान परीसरातून यापुर्वीही चंदनाच्या झाडांची कत्तल करण्यात येऊन तस्करी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०१-२०१९) :** (१) व (२) होय, हे खरे आहे,

तथापी, सदर घटना दि.०१.१०.२०१८ रोजी घडली आहे.

(३) यासंदर्भात चौकशी करण्यात आली असून अमरावती विभागीय आयुक्त कार्यालयाच्या उद्यानातून एका चंदनाच्या झाडाची कत्तल दि.०१.१०.२०१८ रोजी करण्यात आली असून वन संरक्षक यांच्या रॅलीज बंगल्याच्या आवारातील तीन झाडे अर्धवट कापलेले आढळल्याने अज्ञाता विरोधात पोलीस स्टेशन गाडगेनगर येथे गु.र.क्र.१११८/२०१८ भादवि कलम ३७९ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सन २०१७ मध्ये जिल्हा परिषदेच्या परिसरातील चंदनाचे झाड कत्तल करुन चोरी झाल्याचे निदर्शनात आल्याने दि.२१.१२.२०१७ रोजी व विभागीय आयुक्त यांचे बंगल्यातील चंदनाचे झाड चोरी झाल्याची तक्रार प्राप्त झाल्याने पोलीस स्टेशन, गाडगेनगर येथे गु.र.क्र. ९१९/२०१७ व गु.र.क्र. ६१८/२०१७ भादवि कलम ३७९ अन्वये आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करुन सदर गुन्हाचा शोध न लागल्याने अ फायनल करुन मा.न्यायालयाच्या मंजूरीसाठी पाठविण्यात येऊन पुढील तपास चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात काही संस्था,व्यक्ती डिजिटल इंडिया अभियानाअंतर्गत विविध पदांसाठी बनावट जाहिराती देऊन लोकांची फसवणूक करीत असल्याबाबत**

**(४६) १३१९९७ (१०-१२-२०१८). श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात काही संस्था,व्यक्ती डिजिटल इंडिया अभियानातंर्गत विविध पदांसाठी बनावट जाहिराती देऊन लोकांची फसवणूक करीत असल्याचा गंभीर प्रकार माहे ऑगस्ट २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बनावट जाहिरातींची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधीत दोषींना अटक करून त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०२-२०१९) : (१)** हे खरे नाही, राज्यातील पोलीस ठाण्यातील अभिलेखावर याप्रकारच्या गुन्हे/ घटनाबाबत नोंद झाल्याचे आढळुन आलेले नाही.

(२), (३), व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परांडा (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील अनाळा शिवारात कृषी साहित्याची सातत्याने चोरी होत असल्याबाबत**

**(४७) १३२०४६ (१०-१२-२०१८) श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परांडा (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील अनाळा शिवारात माहे ऑक्टोबर, २०१८ या महिन्याच्या सुरुवातीला शेतकऱ्यांचे कृषीपंप, सर्व्हीस वायर, स्टार्टर व पाणबुडी पंपाची चोरी झाल्याची तक्रार शेतकऱ्यांनी संबंधित पोलिस स्टेशनकडे केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक १६ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास पत्राद्वारे निदर्शनास आणून दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मागील वर्षी सुध्दा भूम (जि.उस्मानाबाद) व परांडा तालुक्यातील रुई परिसरात सुध्दा अशाच प्रकारच्या चोऱ्या होऊन त्याचा तपास अद्यापपर्यंत लागलेला नाही याबाबतही स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक १६ ऑक्टोबर, २०१८ रोजीच्या पत्राद्वारे निदर्शनास आणून दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त पत्राच्या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे व त्यानुसार या प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०२-२०१९) :** (१) परांडा तालुक्यात माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये विद्युत मोटारीची वायर चोरी झाल्याबाबत प्राप्त तक्रारीवरून आंबी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(२) व (३) हे खरे आहे.
(४) मौजे पांढरेवाडी शिवारात तलावाच्या सांडव्यात बसवलेल्या विद्युत मोटारीचे ३५० फुट केबल वायर चोरीला गेल्याप्रकरणी आंबी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.९८/२०१८ भा.दं.वि. कलम ३७९ अन्वये दि.१०/१०/२०१८ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा उघडकीस आणून त्यामध्ये १ आरोपीस अटक करुन चोरीला गेलेला मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे.

तसेच, मागील वर्षी मौजे पाथरूड व रामेश्वर येथे विद्युत पंप चोरीच्या दोन घटना घडलेल्या असून त्याप्रकरणी पोलीस स्टेशन भुम येथे गु.र.नं. ०५/२०१७ भा.दं.वि. कलम ३७९ व गु.र.नं. २८/२०१७ भा.दं.वि. कलम ३७९ अन्वये २ गुन्हे दाखल आहेत. सदर दोन्ही गुन्ह्यात मा. न्यायालयास 'अ' वर्ग समरी पाठवुन गुन्ह्याची निर्गती करण्यात आलेली आहे. तसेच रुई परिसरात अशा प्रकारच्या घटना घडलेल्या नाहीत.
(५) विलंब झालेला नाही.

---

**नांदगांव (ता. नांदगांव, जि. नाशिक) पोलिस स्टेशन येथे 'एन.मार्ट रिटेल लि.' या कंपनीचे सी.एम.डी व अन्य सात जणांविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आल्याबाबत**

**(४८) १३२४४९ (१०-१२-२०१८) श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) 'न्यू लुक ट्रेड प्रायव्हेट लि.' नविन नाव 'न्यू लुक रिटेल प्रायव्हेट लि.' असे नाव असलेली कंपनी मुंबई व त्यानंतर याच कंपनीचे पुणे येथे 'एन.मार्ट रिटेल लि.' या नावाने कंपनी सुरू केली असून या कंपनीचे सी.एम.डी. श्री.गोपाल मोहनसिंग शेखावत व अन्य सात जणांविरुद्ध किशोरकुमार मधुकरजी गुप्ता, (रा. नांदगांव, ता. नांदगांव, जि. नाशिक) यांनी दिनांक २९ एप्रिल,२०१७ रोजी वा त्यासुमारास नांदगांव येथे कंपनीचा मॉल सुरु करण्यासाठी त्यांच्याकडून व नांदगांव शहर परिसरातील लोकांकडून सुमारे रुपये २९ लाख गोळा करून कंपनीचा मॉल सुरु न करता आर्थिक फसवणूक केल्याबाबतचा गुन्हा नांदगांव पोलिस स्टेशन येथे नोंदविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर गुन्ह्याची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीनुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०२-२०१९) :** (१) व (२)

सदर प्रकरणी फिर्यादी व इतर यांचेकडून 'न्यू लुक मल्टी ट्रेड एन मार्ट मॉल चे सभासद होण्यासाठी ५५००/- रूपये सभासद फि घेवून त्याबद्दल कंपनीच्या मॉलमधुन २२०/- रूपयेचा किराणा माल फ्रि मिळेल व प्रत्येक सभासदाला ४ वर्षानंतर ११०००/- रूपये लॉयल्टी बोनस मिळेल असे आमिष दाखवून फिर्यादी व इतर यांची एकुण २९,५३, ०००/- रूपयांची फसवणूक केल्या प्रकरणी दि. २९ एप्रिल,२०१७ रोजी नांदगांव पोलिस स्टेशन येथे गु.र.क्र.७६/२०१७ भा.दं.वि.कलम ४२०, ३४ प्रमाणे एकुण ८ आरोपींविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून एका आरोपीस अटक करण्यात आली आहे. सद्यस्थितीत सदर गुन्हा तपासावर आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

**राज्यात फ्रेंडशिप क्लबच्या नावाखाली फसवणूक होत असल्याबाबत**

**(४९) १३२७७३ (१०-१२-२०१८) श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात फ्रेंडशिप क्लबच्या नावाखाली हायप्रोफाईल महिलांसोबत मैत्री करून देण्याचे तसेच एका भेटीत हजारो रुपये मिळवून देण्याचे आमिष दाखवून फसवणूक होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, तद्नुसार चौकशीत काय निष्पन्न झाले व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०१-२०१९) :** (१) व (२) फ्रेंडशिप क्लबच्या नावाखाली हायप्रोफाईल महिलांसोबत मैत्री करुन देण्याचे तसेच एका भेटीत हजारो रुपये मिळवून देण्याचे आमिष दाखवून फसवणूक केल्याबाबत प्राप्त तक्रारीस अनुसरुन ठाणे शहर अंतर्गत नौपाडा पोलीस ठाण्यात गु.र.नं.३५५/२०१८, भादंवि ४२०, ३४ प्रमाणे दिनांक २०/११/२०१८ रोजी गुन्हा दाखल आहे. गुन्हा तपासावर आहे. राज्यात अन्यत्र अशा प्रकारची तक्रार प्राप्त नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बोईसर (जि.पालघर) एमआयडीसी परिसरातील अवधनगर येथे भंगार माफियांनी एका व्यक्तीवर केलेला प्राणघातक हल्ला**

**(५०) १३२८८६ (१०-१२-२०१८) श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोईसर (जि.पालघर) एमआयडीसी परिसरातील अवधनगर येथे दिनांक १७ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास एका तरुणावर भंगारमाफियांनी प्राणघातक हल्ला केला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अवधनगर येथिल बेकायदा बांधण्यात आलेल्या भंगारांच्या दुकानांवर तत्कालिन जिल्हाधिकारी यांनी कारवाई करूनसुध्दा पुन्हा सदरची अनधिकृत दुकाने बांधण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या अनधिकृत भंगाराच्या दुकानामुळे या परिसरात गुन्हेगारीचे प्रमाण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या हल्ल्याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार अद्यापपर्यंत किती जणांना अटक केली व त्यांच्यावर कोणत्या कलमान्वये कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) तसेच या भागातील अनधिकृत भंगाराची दुकाने तात्काळ हटविण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०१-२०१९) : (**१) होय, हे खरे आहे
(२) जिल्हाधिकारी यांनी अनधिकृत भंगाराच्या दुकानांवर कारवाई केली होती व तद्नंतर आजपावेतो पोलीस विभागाकडे अनधिकृत भंगाराच्या दुकानांबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) हे खरे नाही.
(४) प्रस्तुत हल्ल्या प्रकरणी बोईसर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. २२७/२०१८ भा.द.वि. सं. कलम ३२६, ३४१, ३२३, ५०४, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयात २ आरोपीतांना अटक करण्यात आले असून आरोपीविरूध्द मा. न्यायालयात आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे. सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
(५) प्रस्तुत प्रकरणी बेकायदा बांधण्यात आलेल्या पत्र्याच्या शेड धारकांना सदर पत्राचे शेड ७ दिवसांच्या आत स्वखर्चाने काढणेबाबत नोटीसा देण्यात आल्या होत्या. परंतु सदर पत्र्याच्या शेड धारकांनी शासनाच्या नोटीसीविरूध्द मा. दिवाणी न्यायालयात दावे दाखल केले आहेत. सदर प्रकरण सद्यस्थितीत न्यायप्रविष्ठ असून न्यायालयाच्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(६) प्रश्न उद्भवत नाही

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.